www.PapaCambridge.com

Cambridge International AS Level

**Cambridge International Examinations**
Cambridge International Advanced Subsidiary Level

**MARATHI LANGUAGE** **8688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2014**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*3265154129*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, glue or correction fluid.
DO **NOT** WRITE IN ANY BARCODES.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, रोल नंबर व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या पेनने लिहावे.
स्टेपल, पेपर क्लिप, डिंक किंवा दुरूस्त्यांसाठी द्रवपदार्थ वापरू नये.
कोणत्याही बारकोडवर **लिहू नये.**

सर्व प्रश्न सोडवा.
उत्तरांसाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोशांचा उपयोग करण्यास **मनाई आहे.**
प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावी.
प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा उपप्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (SJF/JG) 97040/3
© UCLES 2014

CAMBRIDGE International Examinations

[Turn over

PA CAMBRIDGE

www.PapaCambridge.com

विभाग – 1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

युवक आणि युवकांचे नेतृत्व हा जगात नेहमीसाठीच एक महत्त्वाचा विषय असतो. जी शक्ती स्थापित सत्तेविरूद्ध उभी राहते, न्यायासाठी लढते, ती शक्ती म्हणजे नेतृत्व का ? असा प्रश्न पडतो. याचा अर्थ नेतृत्व केवळ राजकीयच असते असे नाही. समाज आणि देशाला हितकारक आणि दिशादर्शक अशी अनेक क्षेत्रे आहेत. सामाजिक क्षेत्र आहे. विज्ञान, संस्कृती, पर्यावरण अशी अनेक क्षेत्रे आहेत. या साऱ्यांतून सकल आणि सामूहिक असे एक नेतृत्व निर्माण होत असते. आज आपण हया सगळ्याच क्षेत्रातील समस्यांची उत्तरे राजकारणात शोधतो किंवा राजकीय नेतृत्वाचीच या समस्यांची उत्तरे देण्याची जबाबदारी आहे असे मानतो. सत्तेची ती जबाबदारी असू शकते. मात्र आपआपल्या क्षेत्रातील समस्यांची उकल त्या क्षेत्रातील तज्ज्ञ अर्थात त्या क्षेत्रातील नेतृत्वानेच करायची असते. त्या अर्थाने सामूहिक नेतृत्व. सकल समाजाच्या भविष्याला दिशा देणारे हे नेतृत्व असावे. युवा नेतृत्वासमोर सार्वकालिक आदर्शाप्रमाणे असणारे स्वामी विवेकानंद हे असेच एक युवा आध्यात्मिक नेतृत्व होते असे आपण म्हणतो. पण त्यांनी विज्ञान, पर्यावरण, संस्कृती, धर्म या सगळयाच बाबतीत आपले विचार मांडले. त्यांची चिंतने आजही मार्गदर्शक आहेत. त्यांनी जे विचार मांडले त्यातून भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला दिशा मिळाली.

युवकांचे नेतृत्व संवेदनशील, निःस्वार्थ, पारदर्शक, किंमत चुकविण्यास सिद्ध असणारे आणि त्यागी असायला हवे. यासंदर्भात महात्मा गांधींचे एक पट्टशिष्य जयप्रकाश नारायणांचे नाव घ्यावे लागेल. आपल्या संपूर्ण क्रांतीच्या आणीबाणीविरूद्धच्या आंदोलनानंतर त्यांनी सत्तेचा मोह धरला नाही. उलट त्यांच्या आंदोलनामुळे जे सत्तेवर आले त्यांची वागणूक वाईट असेल, तर मी त्यांच्याही विरोधात आंदोलन करेन असे ते म्हणाले. इतकी निःस्पृहता हवी. नेतृत्वाच्या मार्गावर मोहाचे अनेक प्रसंग येतात. त्यांना बळी पडायला नको. तत्त्वांशी कुठेही तडजोड नको. आसामच्या बोडो आंदोलनात प्रफुल्लकुमार महंतो यांच्या नेतृत्वात युवक एकत्र आले. ही तरूण मंडळी संपूर्ण परिवर्तनाच्या ध्यासाने सत्तेवर आली अन् मग काय झाले? क्रांतीच्या मार्गात सत्ता येतेच आणि सत्तेत येणे चुकीचे नाही. पण सत्तेवर आल्यावर क्रांतीला तुम्ही दिलेला शब्द विसरणे चूक आहे. ती चूक बहुतांश मंडळी करतात. मोह टाळता येत नाहीत. मला मोह नाही हे सांगण्याचा देखील एक मोह असतोच. '' जेव्हा क्रांतिपुरूष मर्यादापुरूषोत्तम सत्तेत बसतो तेव्हा क्रांतीला सीतेसारखं जमिनीत गडप व्हावं लागतं...'' बाबा आमटे यांचे हे वाक्य फारच सार्थ आहे.

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. तरीही आपण जातीयवाद, महिलांचे शोषण, रूढीवाद यातून मुक्त झालेलो नाही. त्यासाठी जबरदस्त बौद्धिक मंथन हवे. ते नव्या जगाची भाषा कळणाऱ्या आणि स्वीकारण्याची कुवत असलेल्या नवनवोन्मेषशालिनी युवकांतच असते. युवकांबद्दल आपण पूर्वग्रहदूषित असता कामा नये. नवी स्मृती लिहिताना देशभक्ती हवी. ती संधी तरूणांना द्यायला हवी. ते देशभक्त आहेतच. त्यांच्या या भावनेला वाट करून देणारी परिस्थिती आणि विश्वास निर्माण केला जायला हवा.

© UCLES 2014

PA CAMBRIDGE

www.PapaCambridge.com

**1 पुढील शब्द हे वरील उताऱ्यातील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द आहेत. ते ज्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द आहेत असे शब्द शोधून त्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.**

**(i)** अन्याय

**(ii)** अहितकारक [1]

**(iii)** स्वार्थी [1]

**(iv)** बद्ध [1]

**(v)** अविश्वास [1]

**2 खाली दिलेले वाक्यप्रयोग अचूकपणे स्पष्ट करणारे शब्द वरील उताऱ्यातून शोधून लिहा. उदाहरणार्थ – प्रत्येक काळात लागू पडणारे – सार्वकालिक**

**(i)** समाजाला दिशा दाखविणारे [1]

**(ii)** मानवी संवेदनांना जाणणारे [1]

**(iii)** मर्यादशील असा उत्तम पुरूष [1]

**(iv)** नवनवे उन्मेष प्रकट करणारी प्रतिभा [1]

**(v)** काही विशिष्ट पूर्वग्रह बाळगणारा [1]

**3 पुढील प्रश्नांची मराठीत उत्तरे लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहिलेली असावीत. उताऱ्यातील वाक्यांचे अनुकरण उत्तरात नसावे. अन्यथा गुण कमी होतील. प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** नेतृत्व म्हणजे काय ? [2]

**(ii)** सामूहिक नेतृत्व कशाला म्हटले जाते ? [2]

**(iii)** विवेकानंदांच्या नेतृत्वाची विशेषता काय होती ? [2]

**(iv)** युवकांचे आदर्श नेतृत्व कसे असावे ? त्याची भारतातील उदाहरणे कोणती ? [3]

**(v)** क्रांती आणि सत्ता यांचा संबंध कसा असतो ? [3]

**(vi)** युवकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण कसा असावा ? [3]

एकूण गुण [20]



PA CAMBRIDGE

## विभाग – 2

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

युवा कोण या प्रश्नाचे उत्तर शोधताना त्याला वयाचा निकष लावायचा झाला तर 1985 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर युनोने वयाच्या हिशेबाने 35 वर्षापर्यंत युवा असे म्हटले होते. त्यातही विकसनशील देश आणि विकसित देश असा भेद निर्माण झाला होता. विकसनशील आणि अविकसित देशांच्या मते तरूण ठरविण्याचे वय 40 असायला हवे होते. बरे, युवा म्हटले की आपल्या डोळयासमोर उभा राहतो तो महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये वावरणारा तरूण. एका कॅम्पसमध्ये वावरत असल्याने तो एकत्र दिसतो, भेटतो, संघटित वाटतो. तो अध्ययनरत आहे. समाजात आणि राष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घटना त्याला कळतात आणि तो त्यावर विचार देखील करू शकतो. मात्र, युवा केवळ महाविद्यालयातच नाही तर ग्रामीण भागात, अनेक क्षेत्रात युवा आहे. जगात आजवर मानवाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या विविध लढ्यांचे नेतृत्व युवकांनीच केलेले दिसून येते. मग ते अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध असो वा भारताचा स्वतंत्रता संग्राम! अशा लढ्यातले वीर, ज्यांची नावे आज आपण मोठ्या आदराने घेतो, ते सगळे युवकच होते. नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी, भगतसिंग हे सगळेच तरूण होते. भारतात असो की परदेशात क्रांतीचा हा हुंकार युवा मुखातूनच उमटला आहे. 1988 साली चीनच्या तियानमेन चौकात जी तरूणाई बिजींग प्रवेशासाठी एकत्र आली होती, त्यांची मागणी स्वातंत्र्य आणि लोकशाहीची होती. त्यांना कुणी प्रेरणा दिली? त्या काळात आजच्यासारखे संवादाचे नेटवर्क नव्हते. त्या लढ्याच्या अग्रभागी नेतृत्व म्हणूनही कुणी नव्हते. युवांमध्ये नैसर्गिकपणेच जी प्रेरणा अनुस्यूत असते, त्या प्रेरणेतूनच ते युवक एकत्र आले होते. अगदी अलीकडे सोमालिया, इंडोनेशियासारख्या देशात सत्तापरिवर्तन झाले ते युवाक्रांतीतून झाले.

आंदोलने सहसा समाजाच्या अन्यायाविरूद्धच्या उर्मीतून निर्माण होत असतात. त्यांच्या शीर्षस्थानी कुणीतरी असतोच. त्याला आपण नेता म्हणतो. कारण जगाला चेहरा हवा असतो. शीर्षस्थ नेत्याच्या वागणुकीतून एक प्रेरणा मिळत असते. मात्र आंदोलन तेव्हाच चिरस्थायी होते, जेव्हा त्यात नेतृत्वाची दुसरी फळी तयार होत असते. भिन्न पातळ्यांवरचे नेतृत्व हवेच असते. कायम स्वरूपाच्या नेतृत्वाच्या विकासासाठी सतत प्रयत्न हवेत. इंडोनेशियात सत्तापरिवर्तनासाठी अनेक आंदोलने झाली आणि अनेकवेळा सत्ताबदल देखील झाले. क्रांतीची स्वप्ने उराशी बाळगून नवी मंडळी दरवेळी सत्तेत येत राहिली आणि तरीही मग आणखी एका अन्यायाविरूद्धच्या आंदोलनाची गरज तिथेच का भासत राहिली? सत्तेत आल्यावर काहींनाच विवेक जागा ठेवता येतो. नेल्सन मंडेला 26 वर्षे तुरूंगात होते. ऐन तारूण्यात ते तुरूंगात होते. रंगभेद हटल्यावर ते दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष झाले. भरकटले मात्र नाहीत. पोलंडचे लेक वॉलेसा मजदूर नेता होते. सत्तापरिवर्तनानंतर ते सत्तेत गेले नाहीत.

आज जगभरातल्या तरूण पिढीबाबत चिंता व्यक्त केली जाते. तरूण पिढी चैनखोर, व्यसनाधीन आहे असे म्हटले जाते. पण नुसती चिंता न करता यावर चिंतनही झाले पाहिजे. चिंतन केले तर कळेल की अख्खी युवा पिढी तशी नाही. दुसरे म्हणजे युवकांच्या या अवस्थेला संपूर्ण समाजच जबाबदार आहे, हे देखील लक्षात येईल. समाजातल्या विविध व्यवस्थांनी संस्कार करण्याची, चांगले वातावरण आणि वैचारिक, विवेकनिष्ठ व्यासपीठे निर्माण करण्याची आपली जबाबदारी नीट पार पाडली नाही, हे देखील लक्षात येईल. युवा म्हणजे ज्वाला आहे. आंधळेपणाने त्यांनी हे जग जाळत सुटू नये यासाठी संस्कार हवेत. त्यांच्यासमारे तसे आदर्श हवेत. त्यांचे नेते, सहकारी जे करतात तसेच ते करतील.

© UCLES 2014

www.PapaCambridge.com
PA CAMBRIDGE

www.PapaCambridge.com

4 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** युवा असण्याचे कोणते निकष सांगितले जातात ? [2]

**(ii)** युवक आणि महाविद्यालय यांचा संबंध कसा असतो ? [3]

**(iii)** स्वातंत्र्यलढ्यांशी युवकांचा संबंध कशाप्रकारचा दिसून येतो ? [3]

**(iv)** आंदोलने चीरस्थायी कशी आणि केव्हा होतात ? त्याची उदाहरणे कोणती ? [4]

**(v)** तरूण पिढीबाबत कशाप्रकारच्या चिंतनाची गरज आहे ? [3]

**एकूण गुण** [20]

5 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांच्या उत्तरातील एकूण शब्दसंख्या 140 पर्यंत असावी. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांतून स्पष्ट होत जाणारी जगभरातील युवाशक्तीची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत वर्णन करा. [10]

**(ii)** तुमच्या देशातील युवकांची सद्यःस्थिती आणि त्यांच्यापुढील आव्हाने यावर प्रकाश टाका. [5]

**एकूण गुण** [20]

© UCLES 2014

PA CAMBRIDGE

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

© UCLES 2014

PA CAMBRIDGE

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

© UCLES 2014

PA CAMBRIDGE

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.

© UCLES 2014

PA CAMBRIDGE